# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

## लेखा व वित्त विभाग

मुंबई पुणे रोड, पिंपरी, पुणे ४११ ०१८,

Website – pcmcindia.gov.in E-mail – account@pcmcindia.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जावक क्र.लेखा/२९/कावि/७६ /२०२२ दिनांक :- २३/०५/२०२२

परिपत्रक

विषय : सन २०२२-२३ चे अंदाजपत्रकातील तरतूदींचे वर्गीकरणाबाबत.

मा.आयुक्त सो यांनी सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रकास मान्यता दिली असून सदर अंदाजपत्रकाची अंमलबजावणी सर्व विभागांनी करणेकामी सर्व विभागांना सुचना देण्यात आलेल्या आहेत. लेखा विभागाकडे काही विभागांकडून कामांना तरतूदी कमी / अपु-या असल्याने वर्गीकरणाबाबत प्रस्ताव सादर केले जात आहेत. काही विभागांकडून तरतूद वर्गीकरणाबाबतचे प्रस्ताव लेखा विभागाकडे अभिप्रायाकामी न पाठविता मा.आयुक्त सो यांची मान्यता घेऊन लेखा विभागाकडे तरतूद वर्गीकरण आदेश अंमलबजावणी पाठविणेत येत आहेत. सदर आदेशांची लेखा विभागामार्फत तपासणी केली असता त्यामध्ये अनेक त्रुटी आढळून आल्या आहेत उदा. अंदाजपत्रक पानांक व अनुक्रमांक चुकणे, घट करणेकामी प्रस्तावित केलेल्या तरतूदींमध्ये तरतूद शिल्लक नसणे अथवा ज्या विभागामधुन तरतूद घट केलेली आहे त्या विभागाची तरतूद घट करणेबाबत परवानगी न घेणे, कामाची नावे चुकणे, स्थायी समिती ठराव क्रमांक चुकणे, इत्यादी. अशा आदेशातील असलेल्या त्रुटींमुळे सदर आदेशाची अंमलबजावणी करता येत नाही. मनपा अंदाजपत्रकामध्ये कोणताही बदल करावयाचा असल्यास आर्थिक बाबत म्हणून लेखा विभागाचा अभिप्राय घेणे आवश्यक असते. परंतु काही विभागाकडून लेखा विभागाचा अभिप्राय न घेता परस्पर मा.आयुक्त सो यांचेकडे वर्गीकरणाबाबतचे प्रस्ताव व आदेश सादर केले जात आहेत.

सबब, सर्व विभागांना सुचीत करणेत येते की, अंदाजपत्रकातील तरतूद वर्गीकरण करावयाचे असल्यास विभागामार्फत वर्गीकरण प्रस्ताव अंदाजपकामध्ये नमुद केलेल्या कामाच्या संकेतांकासह ( Budget Code) लेखा विभागाकडे अभिप्रायाकामी पाठविणेत यावेत. लेखा विभागामार्फत सादर प्रस्तावाची तपासणी करून मा.आयुक्त सो यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव सादर करणेत येतील. लेखा विभागाच्या अभिप्रायाशिवाय विभागांनी परस्पर वर्गीकरण आदेश निर्गमित करण्यात येऊ नयेत. याची सर्व संबंधीतांनी नोंद घेणेत यावी.

२०/०५/२२

( राजेश पाटील )
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८

प्रति:- सर्व संबंधीत विभाग